**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५८ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८८** **दिनांक – ०२/०९/२०२५**

**विभाग – प्रकल्प विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं. ६४६६, ७५४७, ७१८९ या ठिकाणी नाटयगृह व व्यावसायिक जागा/ शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं. ६४६६,७५४७,७१८९ या ठिकाणी नाटयगृह व व्यावसायिक जागा/ शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे बाबत अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी स्पॅनेक्स एईसी सोल्युशन प्रा. लि. पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आली आहे.

स्पॅनेक्स एईसी सोल्युशन प्रा.लि. पुणे यांनी यांनी रू. ३१,८३,७५,५१४/- रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले असुन त्यास मा. शहर अभियंता, यांचे कडुन तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाच्या बांधकाम आराखडयास नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी ठेकेदार नियुक्ती करीता ई -निविदा मागविणे आवश्यक आहे.

सदर कामी अनुदान मागणी करीता मा.संचालक नगररचना, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मा. केंद्र शासनाच्या Urban Challege Fund ( UCF ) योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर योजने अंतर्गत एकुण प्रकल्प रक्कमेच्या २५% रक्कम इतके अनुदान मनपास प्राप्त होणे अपेक्षित आहे. प्रकल्प उभारणी करीता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रक्कमेतुन रक्कम रू. १२.०० कोटीची तरतुद करणे आवश्यक आहे. अर्वरीत रक्कमेची उभारणी गाळे Lease ( भाडेकरार ) व्दारे प्राप्त होणा-या Non Refundable डिपॉझीट ( परत न करण्यायोग्य ठेव ) च्या माध्यमातुन करणे शक्य होईल.

१) सदर कामासाठी चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रक्कमेतुन रक्कम रू. १२.०० कोटीची तरतुद करणेस.

२) गाळ्यांचा लिलाव/भाडेकरार/डिपॉझीट ( परत न करण्यायोग्य ठेव ) ही रक्कम प्रकल्पाच्या उभारणीसाठी वापरणेस.

३) सदर कामासाठी ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे

---------------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |